## डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना


पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in


जा.क. पोउपआ/वावि/अधिसूचना/ १३७ अ/२०२५ दि.१६/०७/२०२५

### –: <u>वाहतूक नियंत्रण सुधारीत अधिसुचना</u> :–

**संदर्भ :– जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/१३७/२०२५, दि. १५/०७/२०२५ यापुर्वी प्रसिध्द करण्यात आलेली अधिसुचना.**

**ज्याअर्थी,** डोबिवली वाहतूक उपविभागाचे हद्दीत डोबिवली पुर्व येथील टाटा लाईन रोड मॉर्डन प्राईड हॉटेल ते एस.बी. आय.बॅक टिळक क्रॉस रोड दरम्यान असलेल्या रस्त्याचे सिमेंट कॉक्रीटीकरणाचे काम आर.ई.इन्फ्रा प्रा.लि. इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपर्स यांचेमार्फत करण्यात येणार आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** कल्याण डोंबिवली महानगरपालीकेच्या डोंबिवली पुर्व येथील मानपाडा रोड कडुन टाटा पॉवर लेन मार्गे टिळक रोड केड जाणाऱ्या वाहनांना **मॉर्डन प्राईड हॉटेल जवळ टाटा पॉवर लेन** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने चार रस्ता पाटणकर चौक मार्गे डावे वळण घेवुन राजेंद्र प्रसाद रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** कल्याण डोंबिवली महानगरपालीकेच्या डोंबिवली पुर्व येथील टिळक रोड कडुन टाटा पॉवर लेन मार्गे मानपाडा रोड कडे येणाऱ्या वाहनांना **सुयोग मंगल कार्यालयाचे समोरील टिळक रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने ताई पिंगळ चौक मार्गे डावे वळण घेवुन शहीद भगत सिंग रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदरची अधिसुचना दि. १६/०७/२०२५ रोजी पासून ते रोडचे काम संपे पर्यंत अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**<u>प्रत माहितीसाठी सविनय सादर,</u>**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे
परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

CamScanner

विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
ठाणे पोलीस पत्रक.
<u>प्रत</u> :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.
<u>प्रत</u> :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.
<u>प्रत</u> :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग/पोनि डोंबिवली वाहतूक उपविभाग.
२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिका–यांकडून आवश्यक सूचना फलके लावून घ्यावीत.

CamScanner